CMYK

भिमसैनिकांच्या घामाच्या पैशातून लवकरच शोर्यस्तंभ उभारणार - प्रा. जोगेंद्र कवाडे >> पान 2

स्वा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींसाठी फिजिओथेरपी आणि बहुविद्याशाखीय पुनर्वसन केंद्राचे लोकार्पण >> पान 3

आपत्ती व्यवस्थापनासाठी ३०० आपदा मित्रांची प्रशिक्षणासाठी निवड होणार >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ


**सुविचार**

मूल्ये आपल्या व्यक्तिमत्त्वाला तेज देतात.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



शाहरुख खानच्या घराभोवती संशयास्पद हालचाली, CCTV कॅमेऱ्यातून धक्कादायक खुलासे

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 157 ■ शनिवार, दि. 18 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## सतीश चव्हाण अजित पवार गटाच्या वाटेवर; शिर्डीत होणार पक्षप्रवेश



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना मोठा धक्का बसलाय. आणखी एक नेता त्यांची साथ सोडणार आहे. आमदार सतीश चव्हाण यांची शरद पवार राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिलीये. सतीश चव्हाण उद्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. सतीश चव्हाण हे विधानसभा निवडणुकीपूर्वी अजित पवारांना सोडून आले शरद पवार यांच्यासोबत आले होते. त्यावेळी आमदार सतीश चव्हाण यांचे सहा वर्षासाठी निलंबन करण्यात आलं होतं. राष्ट्रवादी पक्षाकडून हे निलंबन मागे घेण्यात आले आहे. त्यामुळे उद्या त्यांचा पक्ष प्रवेश पार पडणार आहे.

सुनील तटकरे म्हणाले, सतीश चव्हाण यांनी दि. १५/१०/२०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस व महायुती सरकारच्या विरोधात प्रतिमा मलीन करण्याच्या हेतूने पक्षविरोधी भूमिका घेतली म्हणून ६ वर्षासाठी त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आलेले होते. श्री. सतीश चव्हाण यांनी दि. १३/०१/२०२५ रोजी नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, शरदचंद्र पवार या पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर व पक्षाच्या ध्येय धोरणावर विश्र्वास व्यक्त करून पक्षाचे काम प्रामाणिकपणे करण्याचे समक्ष सांगितले असल्याने त्यांचे ६ वर्षासाठीचे निलंबन रद्द करण्यात येत आहे.

कोण आहेत सतीश चव्हाण?

सतीश भानुदासराव चव्हाण हे बी.ई मेकॅनिकलमध्ये पदवीधर आहेत. १९७७ साला पासून कै. आ. वसंतराव काळे यांच्यासोबत विविध चळवळीत काम केले. सन १९८४ सालापासून राजकीय क्षेत्रात काम करत आहे. सन २००८ सालापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मराठवाडा पदवीधर मतदार संघातून विधान परिषद सदस्य म्हणून मी कार्यरत आहेत. त्यांनी शासनाच्या विविध समित्यांवर सदस्य म्हणून देखील काम पाहिले आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य, सिनेट सदस्यपदी कार्य केले आहे. सध्या विधानमंडळाच्या अदाज समिती, सार्वजनिक उपक्रम समितीचा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाचा सदस्य,परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा कार्यकारणी सदस्य, औरंगाबाद येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या सरचिटणीस पदावर कार्यरत आहेत.

# पुणे नाशिक मार्गावर भीषण अपघात

# नऊ जणांचा जागीच मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी : पुण्यातून भीषण अपघाताची बातमी समोर आली आहे. पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. या घटनेमध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. नारायणगाव जवळ हा अपघात आज सकाळी दहाच्या सुमारास झाला आहे. प्रवासी वाहतूक करणाऱ्या मॅक्स ऑटो गाडीला पाठीमागून आयशर टेम्पोने जोराची धडक दिली. चेंडू प्रमाणे ही मॅक्स ऑटो पुढे फेकली गेली. पुढं एक ब्रेक फेल झालेली एसटी रस्त्याच्या बाजूला उभी होती. त्याच एसटीवर जाऊन ही मॅक्स ऑटो आपटली. यात चार महिला, चार पुरुष आणि एका बाळाचा जागीच मृत्यू झाला आहे. इतर तिघे जखमी आहेत.**

या अपघातात मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संबंधित घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी धाव घेतली. अपघातातील जखमींना तात्काळ उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर मृतांमध्ये यात चार महिला, चार पुरुष आणि एका लहान बाळाचा देखील समावेश आहे. जखमी झालेल्यांपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती देखील प्रशासनाकडून देण्यात आली. यामुळे मृतांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पुणे - नाशिक महामार्गावरती एसटीच्या मागे मॅक्स ऑटो जात होती. तर त्याच्या पाठीमागून आयशर टेम्पो प्रवास करत होता. आयशरने जोरात धडक दिल्याने मॅक्स ऑटो हा बसवर जाऊन आपटली. दोन्ही गाड्यांच्यामध्ये आल्याने मॅक्स ऑटो मधील प्रवासी हे गंभीर जखमी झाले आहेत. तर काहींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.



घटनास्थळी आमदार शरद सोनवणे दाखल झाले, त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितलं की, नारायणगावमध्ये ही अपघाताची दुर्दैवी घटना घडली आहे. फार गंभीर अपघात झाला आहे. पुणे नाशिक हायवे वरती अपघात झाला आहे. एका आयशर टेम्पो चालकाने मागून प्रवासी वाहतूक करणाऱ्या या वाहनाला धडक दिली. ते वाहन पुढे जाऊन एसटीला धडकले आणि या झालेल्या भीषण अपघातामध्ये अनेक जण दगावले. काही जण जखणी झाले आहेत, आम्ही आता सरकारी दवाखान्यामध्ये त्यांची भेट घेण्यासाठी जाणार आहोत. काही लोकांचा मृत्यू झाला आहे, तर काही जण जखमी आहेत, काही महिलांचा समावेश आहे अशी माहिती कळते. हा अपघात गंभीर होता प्रत्यक्षदर्शींनी याबाबत सांगितलं या आयशरने प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनाला उडवलं आणि तो पळून गेला. पण, पोलिसांनी त्याला शोधण्याचा काम केलं आहे. पुढे आयशरला पकडलेलं आहे. त्यामुळे खरा अपघात या आयशर चालकामुळे घडला आहे, अशी माहिती यावेळी बोलताना आमदार शरद सोनवणे यांनी दिली आहे.

पोलिस प्रकरणाचा तपास करतील. नेमकं काय घडलं आहे ते समोर येईल. आम्ही घटनास्थळी आलो आहोत. अपघातात गंभीर जखमींना सरकारी दवाखान्यात उपचारांसाठी दाखल केलेलं आहे. आसपासच्या परिसरातीलच ही लोक असल्याची माहिती आहे. आळेफाटा ते नारायणगाव असे प्रवास करणारे सर्वजण होते, याच मार्गावरती वाहतूक करणारे ते वाहन होते. >> पान ३

## १० वीच्या विद्यार्थ्यांना दोन दिवसांत मिळणार हॉल तिकीट

### एसएससी बोर्डाकडून तारीख जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या दाहवीच्या परीक्षेची प्रवेशपत्र ऑनलाइन पद्धतीनं जारी करण्याची तारीख जाहीर कारण्यात आली आहे. दहावी बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट येत्या सोमवारपासून म्हणजेच २० फेब्रुवारीला उपलब्ध होणार आहेत. सर्व माध्यमिक शाळांना फेब्रुवारी मार्च २०२५च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर सोमवार दि. २० जानेवारी २०२५ पासून ॲडमिट कार्ड या लिंक व्दारे वुेपश्रेरव करण्याकरिता उपलब्ध होतील.या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधनेच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

बारावी म्हणजेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्व उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या परीक्षेची प्रवेशपत्र १० जानेवारीपासून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. बारावीची प्रवेशपत्रं www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर ॲडमिट कार्ड या लिंकवरुन डाऊनलोड करता येतील.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्यांचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे, अशा सूचना दिल्या आहेत.

समजा एखाद्या विद्यार्थ्याकडून प्रवेशपत्र गहाळ झाल्यास संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन्हा प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे, अशी माहिती मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली.

## दिल्ली निवडणूक, भाजपचे संकल्प पत्र जारी

### एलपीजी सबसिडी ५०० रुपये, होळी-दिवाळीला १ सिलिंडर मोफत; महिलांना दरमहा २५०० रुपये

**नवी दिल्ली** : दिल्लीची विधानसभा निवडणूक महिन्यावर येऊन ठेपलीये. भारतीय जनता पक्षाने जोरदार प्रचाराला सुरुवात केली असून माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना काऊंटर करण्यासाठी भाजपने नव्या घोषणा केल्या आहेत. दिल्लीत झालेल्या गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठा पराभव पत्कारावा लागला होता. त्यामुळे केजरीवाल यांच्यासमोर आव्हान उभं करण्यासाठी भाजपने जोरदार तयारी केली आहे. दुसरीकडे काँग्रेसने देखील अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका करत घेरण्याचा प्रयत्न केलाय.

**दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपच्या महत्त्वाच्या घोषणा**



महिला समृद्धी योजनेअंतर्गत दिल्लीतील प्रत्येक महिलेला दरमहा २,५०० दिले जातील.

गरीब भगिनींना सिलिंडरवर ५०० ची सबसिडी दिली जाईल आणि होळी आणि दिवाळीला प्रत्येकी एक सिलेंडर मोफत दिला जाईल.

मातृ सुरक्षा वंदना अधिक बळकट करण्यासाठी ६ पोषण किट दिले जातील आणि प्रत्येक गर्भवती महिलेला २१,००० रुपये दिले जातील.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा म्हणाले, महिला समृद्धी योजनेअंतर्गत दिल्लीतील प्रत्येक महिलेला २५०० रुपये दिले जातील. पहिल्या कॅबिनेट बैठकीत समृद्धी योजनेचा निर्णय घेतला जाईल. दिल्लीतील महिलांना प्रत्येक महिन्याला २५०० देण्याचा संकल्प भारतीय जनता पक्षाने केलाय. दिल्लीत ज्या गरिब महिला आहेत, त्यांना एलपीजी सिलेंडरमध्ये ५०० रुपयांची सबसिडी दिली जाईल. रंगपंचमी आणि दिवळीला प्रत्येकी एक सिलेंडर मोफत दिला जाईल. त्याच प्रमाणे मातृ सुरक्षा वंदना योजनेला आणखी ताकद दिली जाईल. यासाठी ६ कीट दिले जातील. प्रत्येक गर्भवती महिलेला २१,००० रुपये देखील दिले जातील.

## महाराष्ट्र 'एनएसएस'च्या १२ स्वयंसेवकांचा कर्तव्यपथावरील संचलनासाठी सराव

**नवी दिल्ली :** प्रजासत्ताकदिनाच्या पथ संचलनासाठी महाराष्ट्रातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)चे १२ आणि गोव्यातील दोन असे एकूण १४ स्वयंसेवक कर्तव्यपथावर तसेच जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये भर थंडीत कसून सराव करीत आहेत.

राजधानी दिल्ली येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिन मुख्य कार्यक्रमासाठी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्यावतीने एनएसएसच्या सराव शिबिराला जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे सुरुवात झाली आहे. या सराव शिबिरात देशभरातून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण २०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. हे शिबिरार्थी योग, कवायत, परेड संचलन सराव, बौद्धिक सत्र, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झाले आहेत.

महाराष्ट्रातील स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रमात राज्यात साजरे होणाऱ्या विविध सणांचे सादरीकरण केले. याअंतर्गत 'मकर संक्रातीचे महाराष्ट्रातील महत्व' या सादरीकरणाला







उपस्थितांनी दाद दिली. याबरोबर १० ते १२ जानेवारी रोजी सर्व शिबिरार्थी राष्ट्रीय युवक महोत्सवानिमित्त भारत मंडपम प्रगती मैदान येथे सहभागी झाले होते.

हे शिबीर ३१ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार असून दररोज सकाळी सहा ते रात्री दहा वाजेपर्यंत विविध कार्यक्रमांचे सराव करीत आहेत, अशी माहिती महाराष्ट्रातून कार्यक्रम अधिकारी म्हणून एनएसएसच्या स्वयंसेवकांसह आलेले डॉ बी. एन. पुरंदरे (कला), श्रीमती एस. जी. गुप्ता (वाणिज्य) व श्रीमती एस. ए. मिठाईवाला (विज्ञान महाविद्यालय), लोनावाळा कॉलेजचे प्राध्यापक डॉ. पवन शिनगारे यांनी दिली.

महाराष्ट्रातील विद्यार्थी - विद्यार्थिनींचा असणार समावेश

महाराष्ट्रातून 'एनएसएस'चे बारा विद्यार्थी सहभागी झालेले आहेत. यातील ११ विद्यार्थी विद्यार्थिनी हे मुख्य पथसंचलनात असणार आहेत. एकूण सहभागी झालेले स्वयंसेवक हे राज्यातील विविध कॉलेजमधून आहेत. सिटी प्रीमियर कॉलेजचा तेजस सोनसरे, जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथील श्रीमती जी. जी. खडसे कॉलेजचा हरीओम इंगळे, नाशिक जिल्ह्यातील ( निफाड, लासलगाव ) एन व्ही पी मंडल्स आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेजचा स्वरूप ठाकरे, वर्धा जिल्ह्यातील बजाज कॉलेज ऑफ सायन्सचा गुरु प्रसाद सतोने, मुंबई येथील के सी कॉलेजचा, आदित्य चंदोला, विद्यालंकार स्कूल ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमधला राहुल धर्मराज, केटीएचएम कॉलेज नाशिक येथील कविता शेवरे, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग फॉर वूमन पुणे येथील वेदिका राजेमाने, हुजूरपागा श्रीमती दुर्गाबाई मुकुंदास महिला विज्ञान महाविद्यालय पुणे येथील पूजा बोंडगे, महात्मा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क तलोडा येथील सुनिता उंद्या, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथील अभिज्ञा मानुरकर, श्री आर एल टी कॉलेज ऑफ सायन्स, अकोला येथील लीना आठवले हे विद्यार्थी एनएसएसच्या शिबिरात सराव करीत आहेत.

गोवा राज्यातून दोन स्वयंसेवकांचा समावेश असून विद्या प्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स एज्युकेशन कम्प्युटर अँड मॅनेजमेंट, पर्वरी येथील फाल्गून प्रीयोळकर आणि गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँड कॉमर्स खंडोला येथील अक्षता कलासगौदरचा समावेश आहे.

या शिबिरासाठी भारतातून २०० स्वयंसेवक सहभागी झाले असून यामधून १४८ स्वयंसेवक कर्तव्यपथ येथे प्रजासत्ताक दिनी पथसंचलन करतील. हा एकूण चमु प्रधानमंत्री यांना आणि राष्ट्रपती यांनाही भेटणार आहेत.

## मस्साजोगमधील आवादा कंपनीच्या कामगाराचा मृतदेह रस्त्यावर पडलेला आढळला; बीडमध्ये पुन्हा खळबळ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीतील एका पंजाब राज्यातील मजुराचा मृत्यू झाला आहे. केज येथील रोडवर संबंधित कामगाराचा मृतदेह सापडला असल्याचं समोर आलं आहे. सदर कामगाराचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

पंजाब राज्यातील गुरुदास नावाचा कामगार हा केज तालुक्यातील मस्साजोग येथील आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीत मजूर म्हणून काम करीत होता. त्याचे नाव रचपाल हमीद मसीह असून तो पंजाब राज्यातील गुरुदासपूर येथील रहिवासी आहे. केज शहरातील केज अंबाजोगाई रोडवर असलेल्या चांदणी बार समोर त्याचा मृतदेह रस्त्यावर पडला असल्याचे आढळून आले. केज पोलिसांनी हा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी ताब्यात घेतला आहे.

आष्टी तालुक्यातील वाहिरा गावात दोन सख्ख्या भावांची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली आहे. तर एकजण गंभीर जखमी झाला आहे...आपसातील वादातून घडलेल्या या घटनेमुळे आष्टी तालुक्यात खळबळ उडाली आहे...दरम्यान पोलिसांनी आठ संशयित आरोपींना ताब्यात घेतला असून गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात असलेल्या वाहिरा या गावात आदिवासी समाजातील नातेवाईकात असलेल्या जुन्या वादातून ही घटना घडली आहे. या घटनेत अजय भोसले आणि भरत भोसले यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

CMYK

## चीनचा खोडसाळपणा

भारताचा शेजारी असणारा पण भारताला कायम पाण्यात पाहणारा चीन सतत काही ना काही खोड्या काढून दोन्ही देशातील तणाव कायम वाढवत असतो. हे आताच नाही तर १९६२ पासून चालू आहे. १९६२ साली भारताशी मैत्रीचा हात पुढे करून हिंदी चिनी भाई भाई म्हणत त्याने भारताचा केसाने गळा कापला. त्यानंतरही त्याने भारताच्या सतत खोड्या काढून भारताला त्रास दिला. कधी त्याने भारतात घुसखोरी केली तर कधी त्याने सीमेवर नवीन गावे वसवली तर कधी भारतातील गावांना चिनी नावे देऊन ती गावे चीनच्या हद्दीत असल्याचा दावा केला अर्थात चीनच्या या दाव्याला किंवा खोडसाळपणाला भारताने कधी भीक घातली नाही तरीही त्यांचा खोडसाळपणा कमी झाला नाही उलट वाढतच गेला. मागील वर्षी चीनने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनच्या नकाशात दाखवले होते. या नकाशात त्याने भारतातील लडाख आणि अरुणाचल प्रदेशातील काही गावांना चीनमध्ये दाखवले इतकेच नाही तर त्या गावांना चिनी नावे देखील दिली होती. चीनच्या या खोडसाळपणाची भारताने तातडीने दखल घेऊन त्याचा निषेध केला होता. भारताच्या निषेधानंतरही चीन भारताच्या खोड्या बंद करत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे यावेळी चीनने भारताच्या लडाखमध्ये दोन नव्या काऊंट्याची घोषणा करत घुसखोरी केली. पंधरा दिवसापूर्वीच भारताच्या हे लक्षात आले भारतीय लष्कराने आणि परराष्ट्र मंत्रालयाने याचा चीनला जाब विचारला आहे. चीन एवढ्या वरच थांबला नसून चीनने आता भारताशी वॉटर वार सुरू केले असून चीनने ब्रह्मपुत्रा नदीवर मोठा जल प्रकल्प सुरू केला आहे या जल प्रकल्पामुळे भारताला भविष्यात मोठ्या जल संकटाला सामोरे जावे लागणार आहे . दुसऱ्यांच्या खोड्या काढून गंमत पाहण्याची चीनची जुनी खोड आहे. अशी खोड तो फक्त भारताचीच काढतो असे नाही तर इतर देशांचीही काढतो मात्र आशिया खंडातील विशेषतः भारताच्या शेजारील काही देशांना त्याने वारेमाप कर्ज देऊन तर काही देशांना धाक दाखवून गप्प बसवले आहे. भारत मात्र त्याच्या या खेळीला बळी पडत नाही म्हणूनच तो अशा खोड्या अधून मधून काढत असतो. भारताच्या अरुणाचल प्रदेश आणि लडाखवर चीनचा डोळा आहे इतकेच नाही तर अरुणाचल प्रदेश हा आपलाच भूभाग असल्याचा दावा चीनने अनेकदा केला आहे. मागील वर्षी चीनच्या झाऊझंग येथे पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत भारताने खेळण्यास नकार दिला त्यावेळी चीनने अरुणाचल प्रदेशातील खेळाडूंना स्टेपल व्हिसा दिला होता. स्टेपल व्हिसा देऊन त्यांनी एकप्रकारे भारताला डिवचले होते. त्या आधी लडाखमध्ये चिनी सैन्य घुसवले होते तेंव्हा दोन्ही देशातील सैन्य एकमेकांपुढे उभे ठाकले होते केंव्हाही युद्धास तोंड फुटेल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी झालेल्या धुमश्र्चक्री नंतर चिनी सैन्य भारताच्या हद्दीतून निघून गेले होते. मात्र सीमेवर त्यांच्या हालचाली कायम चालू असतात. मुळात चीन हा जगातला सर्वात कपटी देश आहे. चीनला जगातील महासत्ता व्हायचं आहे त्यासाठी त्याने विस्तारवादी भूमिका स्वीकारली आहे त्यामुळेच तो शेजारील देशांची जमीन आणि मालमत्ता बळकावीत आहे. त्यांच्या या विस्तारवादी धोरणाला जर कोणी आडकाठी आणणार असेल तर तो भारत आहे हे चीन जाणून आहे म्हणूनच तो भारताच्या अशा अधूनमधून खोड्या काढून भारताला त्रास देत असतो अर्थात त्याच्या या खोड्यांना भारत आता बधणार नाही कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत नसून २०२५ चा भारत आहे. चीनच्या आरे ला कारे करण्याची हिंमत या भारतात आहे त्यामुळेच भारताशी थेट पंगा न घेता अशा छोट्या मोठ्या खोड्या काढून भारताला त्रास देण्याचे धोरण चीनने अवलंबले आहे.

# भिमसैनिकांच्या घामाच्या पैशातून लवकरच शोर्यस्तंभ उभारणार - प्रा. जोगेंद्र कवाडे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बिबी :** अनेक वर्षापासून आपण येथे शहीदांना अभिवादन करण्यासाठी येतो पण येथे जमीन दिसते स्मारक उभे राहत नाही असे अनेकांना वाटते पण बेईमानीतून नव्हे तर बाबासाहेबांच्या भिमसैनीकांच्या घामातील पैशातून स्मारक झाले पाहीजे हीच माझी इच्छा आहे त्यामुळे येथे लवकरच शौर्यस्तंभ उभारणार असल्याचे प्रतिपादन लाग मार्च प्रनेते प्रा जोगेंद्र कवाडे यांनी काल १६ जाने रोजी एतिहासिक राहेरी पुलाजवळील नामांतर स्मुती सोहळ्यात शहीदांना अभिवादन कार्यक्रमात बोलतांना केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चरणदास इंगोले हे होते तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून प्रा जोगेंद्र कवाडे, जयदिप कवाडे हे होते तर प्रमुख उपस्थितीत आमदार सिद्धार्थ खरात जिल्हाध्यक्ष भाई विजय गवई, गौतम भाऊ कासारे, राजाभाऊ सावळे, भिकाजी इंगळे, विकास कासारे, राहुल कासारे,सुमित चव्हान, अमित राऊत, शेख मसूद,मनसब खा पठाण हे होते तद् आगोदर प्रा कवाडे जिल्हा अध्यक्ष गवई आमदार खरात यांच्या हस्ते शौर्यस्तंभाचे भुमीपूजन करण्यात आले.

पुढे बोलतांना प्रा कवाडे म्हणाले की,मी भिमाकोरेगावचा आदर्श घेवून विद्यापिठाला बाबासाहेबांचे नाव देण्यासाठी लाग मार्च काढला त्यासाठी पंधरा वर्ष मोठा संघर्ष केला यात अनेक भिमसैनीक शहीद झाले त्यांच्या शक्तीने व बलीदानामुळेच नामांतर झाले त्या नामांतराच्या शौर्य व बलीदान दिलेल्या भिमसैनीकांना अभिवादन करण्यासाठी येथे येतो आपण कोणावर अन्याय करायचा नाही पण जे अन्याय करतील त्याची तक्रार न करता प्रतीकार करा आता आम्ही यापुढे अन्याय सहण करणार नाही या स्मारकासाठी सर्वांनी दान द्यावे असे सांगून रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य कधी होणार हे मला विचारले जाते पण ज्याने ते तोडले त्यांना का विचारत नाही जे लोक चांगले असतील त्यांना जवळ करा जे वाईट आहे त्यांना दूर करा तेव्हाच रिपब्लिकन ऐक्य होईल असे शेवटी अवाहन केले.

यावेळी प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष भाई विजय गवई म्हणाले या संघर्ष भूमीवर भिमाकोरेगाव सारखा स्तंभ आपल्याला प्रा कवाडे सरांच्या मार्गदर्शनात येथे उभा करायचा असून भव्यदिव्य शहीदांचे स्मारकही लवकरच करायचे असून त्यासाठी भिमसैनीकांनी दान देवून सरांच्या पाठिमागे गंभीर उभे राहण्याचे अवाहन केले.

आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की,आमदार सिद्धार्थ खरात - १९७८ मध्ये मराठवाडा विद्यापिठाला नाव देण्यासाठी ठराव झाला पण सतरा आठरा होवूनही वर्ष नाव न दिल्याने लाग मार्च प्रनेते जोगेंद्र कवाडे सर यांच्या नेत्वात्वात हाजारो भिमसैनीक नागपूरवरून हा मार्च घेवून निघाले पण हा लाग मार्च येथे या पुलावर आडवला असता आम्ही जगू किंवा मरु असा पवित्रा भिमसैनीकांनी घेवून या संघर्ष भूमीत मोठा संघर्ष झाला व पोलीसांनी अमानूष लाठी हाल्ला केला यात अनेक बांधव शहीद झाले या लाग मार्च आमच्या परीसरातील लोकांनी सहकार्य केले त्यामुळे आमचाही सहभाग यात होता येथील स्तभ हा क्रांती चा आहे मी प्रशासनात असतांना मला काही करता येत नव्हते पण आता मी लोकप्रतिनिधी आहे त्यामुळे यापुढचा लढा हा रस्त्यावरील नसून विचाराचा आहे मला आदेश द्या मी समाजाच्या उन्नतीसाती काम करणार असुन मी कोणाचा व कोणत्या सरकारचा आहे याचा मला काहीच फरक पडणार नाही मला आता या पुढे काही नको फक्त समाजाची सेवा करायची आहे असे शेवटी सांगीतले जयदिप कवाडे म्हणाले की, जेव्हा जेव्हा आंबेडकरी जनता भटकते तेव्हा आमच्यावर अन्याय होतो त्यामुळे आपल्या नेत्या मागे जनतेने खंभीर उभे राहीले पाहीजे पण समाजात काही लोक बाबासाहेब बनण्याचा प्रयत्न करत आहे जे वंचीताच्या नावाने राजकारण करतात तेच आपल्या नेत्यांला संपवण्याचे षडयंत्र करतात आम्ही बाबासाहेबांच्या रक्तचे आहे असे सांगतात पण नामांतरांच्या वेळेस हेच लोक कवाडे पागल झाल्याचे सांगत होते व नामांतरानंतर हे आमच्या मुळे झाले असे बोंबलत होते पण नामांतर हे भिमसैनिकांच्या बलीदानून झाले हे कवाडे सरांनी तेव्हाच सांगितले होते यावेळी असंख्य भिमसैनीक उपस्थित होते

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २० ते २४ दावोसमध्ये

✻ २०१८ नंतर प्रथमच जाणार ✻ पहिल्या कार्यकाळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरुन आला होता पहिल्या क्रमांकावर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० ते २४ जानेवारी या काळात दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. यासाठी १९ तारखेला पहाटे ते मुंबईतून रवाना होणार आहेत. सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारा आणि आकांक्षांनी परिपूर्ण महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणण्याच्या हेतूने त्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे.

यापूर्वी देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात ३ वेळा दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी झाले होते. औद्योगिक विकासात पाचव्या क्रमांकावरुन महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला होता. राज्यात त्या काळात मॅग्नेटिक महाराष्ट्राचे दोन वेळा आयोजन झाले. आताही या दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भरगच्च कार्यक्रम दावोस दौर्यात राहणार आहेत. अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत. या दौर्यात उद्योगमंत्री उदय सामंत, तसेच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल.



डेटा सेंटर्स, ऑटोमोबाईल्स, सेमिकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येने सामंजस्य करार या दौऱ्यात होणार आहेत. महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक राज्यात आणण्याचा प्रयत्न या दौर्यातून साध्य करण्याचा प्रयत्न होईल. अर्थात प्रामुख्याने यातून रोजगारनिर्मितीचेही उद्दिष्ट साध्य केले जाणार आहे.

महाराष्ट्राने विविध प्रकारची धोरणे अलिकडेच जाहीर केली आहेत, त्याबाबत सुद्धा ते विविध व्यावसायिक बैठकांमध्ये अवगत करतील आणि त्यातून महाराष्ट्राच्या एकूणच सर्वांगिण विकासाला चालना देतील.

समतोल विकासावर भर : देवेंद्र फडणवीस

राज्यात गुंतवणूक आणताना किंवा पायाभूत सुविधांचा विकास करताना आम्ही सातत्याने चौफेर विकास कसा होईल आणि प्रादेशिक समतोल कसा राखला जाईल, यावर भर दिला. या दावोस दौऱ्यात सुद्धा महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात आणि सर्व विभागात गुंतवणूक कशी येईल, यादृष्टीने आमचे प्रयत्न असतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## सैफ अली खानला आता कशाचा धोका? प्रायव्हेट रुममध्ये शिफ्ट केले, बाहेरच्या लोकांना भेटण्यापासूनही अडवले

**मुंबई/प्रतिनिधी :** गुरुवार, १६ जानेवारी हा दिवस सिनेसृष्टीसाठी अतिशय धक्कादायक सिद्ध झाला. या दिवशी बॉलिवूडमधील नवाब सैफ अली खानवर त्याच्या राहत्या घरात हल्ला झाला. या हल्ल्यात तो गंभीररित्या जखमी झाला. सैफच्या पाठीत सुरा खुपसण्यात आला. त्याच्या मानेवर वार करण्यात आले. त्याच्यावर दोन्ही हातांना इजा झाल्या आहेत. सैफ अली खान सध्या मुंबईतील लीलावती रुग्णालयात असून तिथे त्याच्यावर दोन शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत.

या प्रकरणात नवनवीन अपडेट्स समोर येत आहेत. चोराने सैफच्या पाठीत चाकू खुपसला, हा चाकूचा अडीच फूट आत गेला होता. सैफच्या स्पायनल कॉर्डला धक्का बसल्याचे बोलले जात होते. सर्जरी करून डॉक्टरांनी चाकूचा तुकडा बाहेर काढलाय. सैफचा पॅरालिसिसचा धोका टळला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

पान १ वरून...

## नऊ जणांचा जागीच मृत्यू

या वाहनाची भीषण अवस्था झाली आहे. आयशर आणि त्या बसच्या मध्ये त्या छोट्या वाहनाचा चुराडा झाला आहे. मी आता सरकारी दवाखान्यात चाललो आहे. तिथे मी प्रत्यक्ष डॉक्टरांची भेट घेऊन बोलेन. जे यामध्ये गंभीर जखमी झाले आहेत त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करू असंही पुढे ते म्हणालेत.

या ठिकाणी अनेकदा अपघात झालेले आहेत. वाहन चालक ओव्हरटेक करण्याच्या नादात भान न राखता वाहने चालवतात. सकाळच्या वेळी हा अपघात झाला आहे. अशा प्रकारे वाहन चालक आपल्या वाहन चालवत असतील तर ते फार चुकीचा आहे, असंही आमदार शरद सोनवणे यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला शोक

या अपघातात मृत्यू झालेल्या नागरिकांनाप्रती मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त केला आहे. तर त्यांनी मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देणार असल्याची माहिती दिली आहे. याबाबतची पोस्ट त्यांनी सोशल मिडियावर शेअर केली आहे. पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगाव जवळ झालेल्या भीषण अपघातात ९ कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करतो. मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून करण्यात येईल. जखमींच्या उपचाराची योग्य काळजी घ्या, असे मी पुणे पोलिस अधीक्षक यांना सांगितले आहे, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# व्यवसायात यशासाठी 'मर किंवा मार' हा निर्धार गरजेचा : डॉ धनंजय दातार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** आज प्रत्येक क्षेत्राप्रमाणे व्यवसायातही तीव्र स्पर्धा आहे. व्यवसायात प्रवेश करणे सोपे असले तरी टिकून राहणे अवघड असते. व्यवसाय हा विरंगुळ्यासाठी किंवा दानधर्मासाठी करायची गोष्ट नसून त्यात नफा हे एकमेव ध्येय समोर ठेवावे लागते. त्यामुळे व्यवसायात यश मिळवायचे असेल तर नवउद्योजकांनी कामाची लाज न बाळगता मेहनत करावी आणि 'मर किंवा मार' (डाय ऑर किल) अशा निर्धारानेच पाय रोवून उभे राहावे, असा सल्ला दुबई स्थित 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नवउद्योजकांना दिला.

'आकार डिजी ९' न्यूज चॅनलतर्फे आयोजित आणि 'ट्रायझॉन कॉर्पोरेट सर्व्हिसेस' तर्फे प्रस्तुत 'दुबई बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२५' या कार्यक्रमात ते बोलत होते. दुबईतील इंडिया क्लबच्या उत्सव हॉलमध्ये हा कार्यक्रम नुकताच झाला. मराठी उद्योजकांना दुबईत व्यवसाय करण्याची संधी मिळावी व बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने आकार 'डिजी ९'चे संस्थापक प्रभाकर सूर्यवंशी यांनी या बिझनेस टूरचे आयोजन केले होते. दुबईतील प्रथितयश मराठी उद्योजकांशी त्यांनी या कार्यक्रमात संवाद साधला.




मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांचा सत्कार आकार 'डिजी ९'चे संस्थापक प्रभाकर सूर्यवंशी यांनी शाल आणि मोमेंटो देऊन केला

धनंजय दातार म्हणाले, मी ४० वर्षांपूर्वी दुबईत आलो त्यावेळी जी स्पर्धा होती त्याहून अधिक प्रचंड स्पर्धा सध्या आहे. जगभरातून अनेक उद्योजक या करमुक्त बाजारपेठेचा लाभ घेण्यासाठी येथे गर्दी करत आहेत. अशावेळी आपले अस्तित्व राखायचे असेल तर दुसऱ्यावर मात करावीच लागते. व्यवसाय हा फक्त नफ्यासाठीच करायचा असतो. नफ्याचे मार्जिन कमी ठेऊनही आपण स्पर्धेत तग धरु शकतो. मात्र झटपट नफ्याच्या आशेने आलेल्यांना उतावीळपणाने काही मिळत नाही.

दुबईसारख्या बाजारपेठेत व्यवसायात टिकून राहण्यासाठी संयम लागतोच, परंतु येथील कायद्यांचे काटेकोर पालनही करावे लागते, असे सांगून ते म्हणाले, की नवजात अर्भक जसे तीन वर्षांनी चालायला, बोलायला व स्वतःहून खायला लागते तसेच कोणताही नवा व्यवसाय किमान १००० दिवस चिकाटीने चालवला तरच तो स्वतःच्या पायावर उभा राहतो. मराठी तरुणांनी बदलत्या काळात स्वतःची पारंपरिक बुजरी आणि संकोची वृत्ती सोडून देऊन धाडसाने आपला व्यवसाय जागतिक बाजारपेठांत पोचवला पाहिजे. गुणवत्तापूर्ण उत्पादने व अभिनव सेवा स्पर्धात्मक किंमतीत देऊ केल्यास ते हमखास यशस्वी होतील.

'गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम'चे उपाध्यक्ष राहुल तुळपुळे म्हणाले, की कोणताही व्यवसाय सुरू करताना ग्राहकांना कशाची गरज आहे याचा विचार करुन संधी कशी साधता येईल, याचा विचार नवउद्योजकांनी करावा. गेल्या काही वर्षांत दुबईत बाहेरुन येणाऱ्या व्यावसायिकांची संख्या वाढली असल्याने प्रत्येक क्षेत्रात संधी आहे, हे आढळत आहे.

'बीसीडब्ल्यू इन्शुरन्स कन्सल्टन्सी'चे व्यवस्थापकीय संचालक विवेक कोल्हटकर यांनी जोखीम व्यवस्थापनाविषयी (रिस्क मॅनेजमेंट) मार्गदर्शन केले. दुसऱ्या देशात व्यवसाय करताना तेथील बाजारपेठेचा अभ्यास करुन व कल बघून मगच पाऊल टाकावे. मराठी तरुणांना दुबईत व्यवसाय संधींचे मार्गदर्शन करण्यासाठी व दिशा देण्यासाठी गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम कार्यरत आहे, असे त्यांनी नमूद केले.


संयुक्त अरब अमिरातीत (युएई) अनेक वर्षांपासून आरोग्यक्षेत्रात सेवा देणारे डॉ. संजय पैठणकर तसेच या कार्यक्रमाचे प्रायोजक 'क्विक हील'चे ओंकार शेणोलीकर आपले अनुभव सांगितले. श्री. शेणोलीकर यांनी तंत्रज्ञानसंबंधित व्यवसायांबद्दल माहिती दिली. इतिहासात अटकेपार झेंडा रोवणारा मराठी माणूस कोणत्याही क्षेत्रात मागे नसून अनेक मराठी उद्योजकांनी भारताबाहेर महाराष्ट्राचे नाव मोठे केले आहे. त्यांचा आदर्श घेऊन आगामी काळात अनेक मराठी उद्योजक नक्की घडतील, असा विश्र्वास प्रभाकर सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. श्र्वेता घालवाडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### या सरकारमध्ये रक्षकच भक्षक झाले आहेत- फौजिया खान



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** परभणीतील आंबेडकरी अनुयायांच्या वतीने परभणी ते मुंबई अशा लाँग मार्चला आज पासून सुरुवात झाली आहे. परभणीत घडलेल्या दंगलीनंतर आंबेडकरी अनुयायांवर करण्यात आलेल्या अत्याचारा विरोधात न्याय मिळविण्यासाठी हा लाँग मार्च काढण्यात येत आहे. या लाँग मार्चला राष्ट्रवादीच्या खासदार फौजिया खान यांनी मार्गदर्शन केले आहे. यावेळी भारतीय जनता पार्टीमध्ये संस्कृती नावाचे काहीच नाही, या देशामध्ये मोठ्या लोकांसाठी वेगळा कायदा आणि गोरगरिबांसाठी वेगळा कायदा आहे हे आपल्याला मोडून काढायचे आहे, या सरकारमध्ये रक्षकच भक्षक झाले आहेत. भाजपाचे हरियाणाचे प्रदेशाध्यक्ष हे सामूहिक बलात्काराच्या आरोपांमध्ये त्यांना अटक करण्यात आली आहे, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असे असतील तर मग लाडकी बहीण सुरक्षित कशी आहे ? लाडकी बहीण म्हणत आहात पण न्याय मागणाऱ्या या बहिणीला तुम्ही न्याय का देत नाहीत, हे सरकारला प्रश्न आहेत असे यावेळी खासदार फौजिया खानम्हणाल्या आहेत.

### आमदार सत्यजीत तांबे आयोजित क्रिकेट स्पर्धेला भारतीय क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांची उपस्थिती





दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे हे त्यांच्या मुळ गावी संगमनेर येथे आले होते. यावेळी आमदार सत्यजीत तांबे आयोजित जयहिंद लोकचळवळ क्रिकेट असोसियशन संगमनेरच्या क्रिकेट मॅचला त्यांनी हजेरी लावली. अजिंक्य रहाणे यांनी क्रीकेट सामना पाहत चाहात्यांशी संवादही साधला आहे. संगमनेर माझी जन्मभूमी आहे त्यामुळे इथे आल्यावर फार बरं वाटलं अशी प्रतिक्रिया अजिंक्य रहाणे यांनी दिली. यावेळी मंचावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात उपस्थित होते.

### नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार सोहळा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या वतीनं राज्याचे आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर आणि रायगड जिल्ह्यातील रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यासह नानिर्वाचित रायगड जिल्ह्यातील आमदार आणि राज्यसभेचे खासदार यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर राज्यभरात आरोग्य यंत्रणेला गतिमान करणार तसेच योग्य पद्धतीचे नियोजन करणार असल्याचे सांगितले. तसेच जाणीवपूर्वक राष्ट्रवादीने मतदारसंघात उमेदवार दिल्याने जाहीर रित्या नाराजी व्यक्त केली होतीत्यामुळे आम्ही फक्त भाजप आणि शिवसेना यांचाच सत्कार ठेवला असल्याचे कर्जत मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले.

### सैफवर हल्ला करणाऱ्या संशयित आरोपीचे नाव आले समोर, पत्नी आणि मुलगा पोलिस स्टेशनमध्ये हजर

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सैफ अली खानवर गुरुवारी १६ जानेवारीला त्याच्या राहत्या घरात हल्ला झाला. या प्रकरणी अनेक अपडेट्स येत आहेत. एक अज्ञात व्यक्ती घरात घुसला आणि सैफवर हल्ला केला. या घटनेने सध्या खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणात पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. मुंबई पोलिसांनी गिरगांव परिसरातून या आरोपीला ताब्यात घेतले आहे. काल सैफ अली खानच्या राहत्या इमारतीच्या पायऱ्यांच्या भागातील सीसीटीव्ही फुटेज समोर आले होते. त्यात त्याचा चेहरा दिसला होता.

# खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींसाठी फिजिओथेरपी आणि बहुविद्याशाखीय पुनर्वसन केंद्राचे लोकार्पण

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दिव्यांग व्यक्तींसाठी फिजिओथेरपी आणि बहुविद्याशाखीय पुनर्वसन केंद्र सुरु केले आहे. या केंद्राचे लोकार्पण कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले. याप्रसंगी भाजप आमदार सुलभा गायकवाड, कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, महापालिका आयुक्त डॉ. इंदूराणी जाखड आदी मान्यवर उपस्थित होते. महानगरपालिकेकडे सुमारे ५५०० दिव्यांग व्यक्तींनी आपली नोंद केली आहे. या दिव्यांग व्यक्तींसाठी आतापर्यंत



महापालिकेमार्फत फिजीओथेरेपीची कोठलेही सुविधा उपलब्ध नव्हती. परंतु आता महापालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या दिव्यांग आणि मतिमंद व्यक्तींना ही सुविधा विनामुल्य उपलब्ध होणार आहे. केंद्रासाठी महापालिकेने काढलेल्या निविदेला मंजूरी दिली गेली. या कामाचे कार्यादेश आधार रिहॅबिलेटेड सर्विसेस यांना देण्यात आले आहेत. या केंद्रांमध्ये दिव्यांग नागरीक जे अंधत्व, बुटकेपणा, मतिमंद, स्नायु दौर्बल्य, सेरेब्रल पाल्सी, मानसिक आजार, स्वमग्नता ,अध्ययन अक्षमता, थैलेसेमिया, सिकल सेल अनेमिया, वाचादोष, बहुविकलांगता, कर्णबधिरता हिमोफिलीया, लोकोमोटर डिसॅबिलीटी इत्यादी व्याधींनी पिडीत आहेत, अशा दिव्यांग व्यक्तींना या केंद्राच्या माध्यमातुन आरोग्य सुविधा निःशुल्क पुरविण्यात येणार आहेत.

याप्रसंगी खासदार श्रीकांत शिंदे यांनी सांगितले की, अशा प्रकारचे केंद्र सुरु करणारी कल्याण डोंबिवली महापालिका ही पहिली महापालिका असेल. उल्हासनगरात सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सुरु करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर कल्याणमध्ये सुपरस्पेशालिटी रुग्णालय सुरु करण्यात येणार आहे. याशिवाय डोंबिवलीतील जुन्या सुतिका गृहाच्या जागेत कर्करोग रुग्णालय बांधले जात आहे. त्याचबरोबर त्याठिकाणी ५० बेड क्षमता असलेले सुतिका गृह बांधले जाणार आहे.

या आरोग्याच्या अद्यायावत सोयी सुविधा लवकर कल्याण डोंबिवलीतील नागरिकांना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरीकांना उपचारासाठी ठाणे, मुंबईला धाव घ्यावी लागणार नाही अशी प्रतिक्रिया खासदार श्रीकांत शिंदे यांनी यावेळी दिली आहे.

## मनु भाकर, डी गुकेशसह चार खेलरत्न पुरस्काराने सन्मानित

### स्वप्निल कुसाळेसह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती भवनात आयोजित राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नेमबाज मनू भाकर आणि बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश यांना ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार २०२४ ने सन्मानित केले. मनू-गुकेश यांच्या व्यतिरिक्त भारतीय पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा-थलीट प्रवीण कुमार यांनाही क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल समान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार मिळाला

राष्ट्रपतींनी कोल्हापूरचा ऑलिम्पिक नेमबाज स्वप्निल कुसाळेसह ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले. याशिवाय राष्ट्रपती मुर्मू यांनी अर्जुन पुरस्कार (आजीवन), राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार (नियमित आणि लाइटटाइम श्रेणी) आणि मौलाना अबुल कलाम आझाद ट्रॉफी विजेत्यांनाही सन्मानित केले. अर्जुन पुरस्कार (आजीवन) प्राप्तकर्त्यांमध्ये भारताचा पहिला पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता मुरलीकांत पेटकर यांचा समावेश आहे, ज्यांनी १९७२ पॅरालिम्पिकमध्ये ५० मीटर फ्रीस्टाइल जलतरणात पदक जिंकले होते. २२ वर्षीय मनू भाकरने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल आणि १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी ती स्वतंत्र भारतातील पहिली थलीट आहे. तर १८ वर्षीय डी गुकेश गेल्या महिन्यात चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करून सर्वात तरुण बुद्धिबळ जगज्जेता ठरला. ही कामगिरी करणारा तो विश्र्वनाथन आनंदनंतरचा दुसरा भारतीय ठरला आहे.

दुसरीकडे, हरमनप्रीत सिंग टोकियो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या हॉकी संघाचा एक भाग होता. दुसरीकडे, प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये पुरुषांच्या उंच उडी-ढ६४ स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. अर्जुन पुरस्काराने सन्मानित झालेल्या ३२ खेळाडूंपैकी १७ पॅरा-थलीट आहेत.

या खेळाडूंना ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार मिळाला

१. डी गुकेश (बुद्धिबळ), २. हरमनप्रीत सिंग (हॉकी), ३. प्रवीण कुमार (पॅरा थलेटिक्स), ४. मनू भाकर (शूटिंग), यांना अर्जुन पुरस्कार मिळाला, १. ज्योती याराजी (थलेटिक्स), २. अन्नू राणी (थलेटिक्स), ३. नीतू (बॉक्सिंग), ४. स्वीटी (बॉक्सिंग), ५. वंतिका अग्रवाल (बुद्धिबळ), ६. सलीमा टेटे (हॉकी), ७. अभिषेक (हॉकी), ८. संजय (हॉकी), ९. जर्मनप्रीत सिंग (हॉकी), १०. सुखजित सिंग (हॉकी), ११. राकेश कुमार (पॅरा तिरंदाजी), १२. प्रीती पाल (पॅरा थलेटिक्स), १३. जीवनजी दीप्ती (पॅरा थलेटिक्स), १४. अजित सिंग (पॅरा थलेटिक्स), १५. सचिन सर्जेराव खिलारी (पॅरा थलेटिक्स), १६. धरमबीर (पॅरा थलेटिक्स), १७. प्रणव सुरमा (पॅरा थलेटिक्स), १८. एच होकातो सेमा (पॅरा थलेटिक्स), १९. सिमरन जी (पॅरा थलेटिक्स), २०. नवदीप (पॅरा थलेटिक्स), २१. नितेश कुमार (पॅरा बॅडमिंटन), २२. तुलसीमाथी मुरुगेसन (पॅरा बॅडमिंटन), २३. नित्य श्री सुमती सिवन (पॅरा बॅडमिंटन), २४. मनीषा रामदास (पॅरा बॅडमिंटन), २५. कपिल परमार (पॅरा ज्युदो), २६. मोना अग्रवाल (पॅरा नेमबाजी), २७. रुबिना फ्रान्सिस (पॅरा नेमबाजी), २८. स्वप्नील सुरेश कुसळे (शूटिंग), २९. सरबज्योत सिंग (शूटिंग), ३०. अभय सिंग (स्क्वॉश), ३१. साजन प्रकाश (पोहणे), ३२. अमन (कुस्ती).

### शाहरुख खानच्या घराभोवती संशयास्पद हालचाली, CCTV कॅमेऱ्यातून धक्कादायक खुलासे

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान हल्ला प्रकरणाने सध्या राज्यभर खळबळ उडाली आहे. पोलिसांच्या तपासात नवनवीन माहिती समोर येत आहे. त्यामुळे हे प्रकरण आणखी चिघळत चाललं आहे. सैफचं हल्ला प्रकरण तापलेलं असतानाच आणखी एक धक्कादायक माहिती समोर आलीय. सैफच्या आधी शाहरुख टार्गेटवर असल्याची माहिती समोर आली आहे. शाहरुखच्या घरावर रेकी करण्यात आली होती आणि त्याचा सीसीटीव्ही व्हिडिओही समोर आलाय. यामधून बरीच धक्कादायक खुलासे झाले.

सैफ अली खानवर हल्ला होण्याअगोदर शाहरुखच्या घराची रेकी झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सैफवर हल्ला होण्याअगोदर याच व्यक्तीने दोन-तीन दिवस आधीच शाहरुखच्या घराची रेकी केल्याचा संशय व्यक्त केला जातोय. १४ जानेवारीला शाहरुखच्या घराची रेकी झाली होती.

## जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर, पोलीस अधिक्षक कार्यालय बुलढाणा व जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभा हॉल पोलीस मुख्यालय येथे पोलीस अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे प्रकल्प संचालक अप्पासाहेब उगले, डॉ. निकिता गायकवाड व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथील अर्चना आराख, मानसोपचार तज्ञ डॉ.कुणाल शेवाळे उपस्थित होते.

अप्पासाहेब उगले यांनी कलम ४ (कोटपा) कलम ६ अ ६ ब त्याचप्रमाणे कलम ५,७,८,९ बाबत मार्गदर्शन केले. डॉ. निकिता गायकवाड यांनी मौखिक आरोग्यबाबत मार्गदर्शन केले. अर्चना आराख यांनी तालुकास्तरीय समन्वय समितीची भुमिका, रुग्णालयातील सोयीसुविधा व जबाबदारी याविषयी माहिती दिली. डॉ. कुणाल शेवाळे यांनी मानसिक आजार, व्यसन व उपचार यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेकरिता पोलिस निरिक्षक/उपनिरिक्षक तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेकरिता पोलिस निरिक्षक/उपनिरिक्षक तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन अनिल गुजे यांनी केले व आभार अर्चना आराख यांनी मानले. या कार्यशाळेकरिता मराठवाडा ग्रामिण विकास संस्थेचे अनिल गुजे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम जिल्हा सल्लागार / समुपदेशक श्री लक्ष्मण सरकटे यांनी परिश्रम घेतले.

## ऑनलाईन गेमिंगमध्ये जिंकलेले पैसे खर्च झाल्यामुळे मावस भावानेच केला भावाचा खून

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिक्षणासाठी बीड जिल्ह्यातून छत्रपती संभाजीनगर शहरात आलेल्या १९ वर्षीय प्रदीप विश्वनाथ निपटे या तरुणाच्या खुनाचे गूढ उलगडण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. प्रदीप सोबतच राहत असलेल्या मावस भावानेच प्रदीपचा खून केलाचं निष्पन्न झाले आहे. केवळ ६५,००० रुपयांमुळे हा खून करण्यात आला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त नितीन बागाटे यांनी दिली.

प्रदीप निपटे आणि त्याचा मावस भाऊ हे इतर दोन साथीदारांसह उस्मानपुरा येथे राहत होते. तर मकर संक्रांतिच्या दिवशी संध्याकाळी प्रदीप याचा मृतदेह त्याचाच रूममध्ये आढळून आला होता. तर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार प्रदीपचा मावस भाऊ हा प्रदीपच्या मोबाईलमध्ये ऑनलाइन गेम खेळायचा त्यातून त्याने एक लाख रुपये देखील कमावले होते. परंतु प्रदीपने त्यातले ६५००० रूपये त्या गेममध्ये गमावले होते. यामुळे प्रदीपचा त्याच्याच मावस भावाने काटा काढला. तर ह्या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलीस उप आयुक्त नितीन बागटे यांनी तब्बल सहा पथके नेमली होती. पोलीस सहाय्यक आयुक्त रणजित पाटील यांच्या पथकाने देखील हा तपास करण्यात मोठे सहकार्य केले तर उस्मानपुराचे पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी देखील या प्रकरणी सखोल चौकशी करून या खुनाचे कोडे सोडवले आहे.



### जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांचे हस्ते महारेशीम अभियानाची सुरुवात

**जालना/प्रतिनिधी :** सन २०२५-२६ मध्ये तुती लागवड समुहात मनरेगा, सिल्क समग्र-२ योजने अंतर्गत तसेच वैयक्तीक नविन तुती लागवड करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी दि. ९ जानेवारी ते ९ फ ` ब्रुवारी, २०२५ या कालावधीत जिल्ह्यात महा-रेशीम अभियान २०२५ राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने जिल्ह्यात महारेशीम अभियान २०२५ च्या रथास जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांचे हस्ते आज (दि.१७) रोजी हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात करण्यात आली.

यावेळी रेशीम विकास अधिकारी श्री. मोहिते यांच्यासह शेतकरी बांधव आणि इतर अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.


# पुण्यातील विश्व मराठी साहित्य संमेलनात पुस्तक आदान प्रदान कार्यक्रम करा; मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पै फ्रेंड्स लायब्ररी आणि कल्याण डोंबिवली महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवलीत पुस्तक आदान प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे .या उपक्रमाचे उद्घाटन मंत्री उदय सामंत आणि आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांनी मराठी भाषा संस्कृती जपण्याचा प्रयत्न संस्थेच्या माध्यमातून करणाऱ्या पे फ्रेंड्स लायबरीचे विशेष कौतुक केले.

डोंबिवलीकर जे काय करतात ते नाविन्यपूर्ण करतात.ज्याच्या ठिकाणी मराठी विश्र्व संमेलन होतात त्या ठिकाणी शासनाला या संस्थेने सहकार्य केलं तर पुस्तकआदान प्रदानचा जो कार्यक्रम आहे तो महाराष्ट्रभर जाऊ शकतो ..महाराष्ट्र मध्ये या संस्कृतीला फार मोठी ताकद मिळू शकते असे सांगितले .पुढे बोलताना मंत्री सामंत यांनी याची मुहूर्त मेढ विश्र्व मराठी संमेलनात पुण्यात रोवली तर या सगळ्या संस्कृतीचा फायदा महाराष्ट्रातल्या मराठी माणसांना मराठी विद्यार्थ्यांना मराठी जनतेला होईल असे सांगितले. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची अनेक वर्षापासून मागणी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही मागणी मान्य केल्याने मराठी भाषेच्या उद्धारासाठी मराठी भाषा सातासमुद्रापार पोचविण्यासाठी आवश्यक निधी मोठ्या प्रमाणावर केंद्र सरकारकडून उपलब्ध होणार आहे त्याच बरोबर केंद्र सरकारच्या मध्यमातून अनेक उपक्रम मराठी भाषेच्या विस्तारासाठी राबविले जाणार आहेत यामुळे मराठी भाषेला जागतिक स्तरावर प्रथम स्थान मिळवून देण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न करणार असल्याचे आश्र्वासन महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांनी दिले

मराठी शाळांच्या घटत असलेल्या संख्येबद्दल बोलताना मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की मराठी शाळा या खाजगी शाळांच्या बरोबरीच्या बनल्या



पाहिजेत तरच विद्यार्थी मराठी शाळांकडे येतील. अशी अनेक उदाहरणं आहेत ज्या ठिकाणी इंग्लिश माध्यमाच्या शाळा सोडून मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये ॲडमिशन घेण्यासाठी रांगा लागतात त्या शाळांचा आदर्श घेऊन महाराष्ट्र तर शाळा निर्माण केलं तर निश्र्चितच मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये वाढ होईल असे सामंत यांनी सांगितले

# आपत्ती व्यवस्थापनासाठी ३०० आपदा मित्रांची प्रशिक्षणासाठी निवड होणार

## इच्छुक युवकयुवतींना नाव नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संकल्पनेतून संपूर्ण देशभरात आपदा मित्र ही योजना राबवण्यात येत आहे. यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील ३०० आपदा मित्र प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. आपदा मित्र प्रशिक्षणासाठी इच्छुक युवक युवतींनी गुगल लिंकवर नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापान प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केले आहे.

आपत्ती दरम्यान प्रथम प्रतिसादकर्ता हा नेहमी स्थानिक रहिवासी असतो. यास्तव स्थानिक स्तरावर उद्भवणाऱ्या अपत्तींना तात्काळ प्रतिसाद देण्याकरीता स्थानिक लोकांना आपत्ती व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण देउन सक्षम करणे हे या योजनेचे मुळ उदिष्ट आहे. या योजनेच्या माध्यमातुन जीवितहानी कमी करणे, समाजात आपत्ती व्यवथापन विषयक जनजागृती करणे व आपत्तीला प्राथमिक स्तरावर प्रतिसाद देण्याकरिता मनुष्यबळ तयार करणे अशा अनेक बाबी साध्य होणार आहेत.

राज्य शासनाने १६ जिल्ह्यात राज्य शासनांमार्फत आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यात ३०० आपदा मित्र प्रशिक्षणासाठी तयार करण्यात येणार आहे. या आपदा मित्रांना शासनाकडून निवड करण्यात येणाऱ्या यंत्रणेमार्फत आपत्ती व्यवस्थापन विषयांबाबत १२ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाकरिता वय वर्ष १८ ते ४५ या गटातील शरिरिक व मानसीकदृष्ट्या सक्षम असलेल्या सामान्य नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, अशासकीय संघटना (एनजीओ), अशा वर्कर्स, अगणवाडी सेविका, शासकीय व निमशासकीय कर्मचारी इत्यादी यांचा समावेश असेल. तथापि, डॉक्टर, माजी सैनिक, स्थापत्य अभियंता यांच्याकरिता वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत राहील (मात्र त्यांना अपघात विमा सुविधा अनुज्ञेय राहणार नाही.) सदर नोंदणी करतांना इच्छुक महिलाचा समावेश करण्याबाबतही नमुद आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदविणाऱ्या आपदा मित्रांना विहित करण्यात आलेले १२ दिवसांचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर शासनाकडून ३ वर्षाकरीता आपत्ती समयी शोध व बचाव कार्य करतांना अपघात झाल्यास रु. ५ लाख मर्यादेत अपघात विमा





तसेच वैयक्तीक आपत्कालीन प्रतिसाद कर्ता संच पुरविण्यात येईल.

याकरिता जिल्ह्यातील इच्छुक युवक-युवती, महिला,पुरुष, स्वंयसेवक यांनी संबंधित तहसिल कार्यालयात नैसर्गिक आपत्ती विभागाशी संपर्क करुन आपली नोंदणी करावी. अधिक माहिती करीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापना विभागास ७०२०४३५९५४/ ९०११७७७२२३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून https://docs.google.com/spreadsheets/d/1rNaSbpt1wQiQdH9bVp3naEKs3miCHs9v3Se5xw/edit?usp=sharing या गुगल लिंकवर संपूर्ण माहिती भरावी. सदर माहिती २२ जानेवारी, २०२५ पर्यंत जिल्हा नियंत्रण कक्ष, buldhanaddmogmail.com किंवा rdcšbuldhanarediffmail.com या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षणासाठी तक्रार समिती बंधनकारक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालयात व इतर खाजगी क्षेत्र, इंन्टप्रायजेस, सहाकरी संस्था, क्रीडा संकुले, प्रेक्षागृहे, मॉल्स, अशासकीय संघटना, ट्रस्ट, रुग्णालये, शुश्रुषालेय. वाणिज्य, शैक्षणिक, औद्योगिक कार्यालय, संस्थेत इत्यादी १० पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे बंधनकारक केले आहे. अंतर्गत समिती स्थापन न करणाऱ्या कार्यालयांचे लायसन्स रद्द किंवा व्यवसाय पुढे सुरु ठेवण्यास मज्ञाव करण्यात येईल. अंतर्गत तक्रार समितीमध्ये किमान ५ सदस्य असावेत. समितीची अध्यक्षा महिलाच असावी, समितीमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा व एका अशासकीय सदस्याचा समावेश करण्यात यावा. कामाच्या ठिकाणी महिलांच लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मधील कलम २६ नुसार जर एखाद्या मालकाने



(अ) अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही (ब) कलम १३,१४,२२ नुसार कारवाई केली नाही (क) या कायदयातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास लायसन्स रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. सदर अधिनियमाची प्रभवी अंमलबजावणी व कार्यवाही करण्यासाठी १० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी आस्थपना यांनी आपल्या कार्यालया अंतर्गत तक्रार समिती दि. २७ जानेवारी २०२५ पर्यंत गठित करुन तसा फलक कार्यालयाचे दर्शनी भागात लावण्यात यावे.

सदर कामास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेले आहेत. तरी सर्व कार्यालयांमध्ये तात्काळ अंतर्गत तक्रार समिती गठित करण्यात येवून तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बुलढाणा यांचेकडे dwcdo.bul.gmail.com / dwcdšbulyahoo.com या मेलवर सादर करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे बुलढाणा यांनी केले आहे.




# आंघोळ न करणे, वैयक्तिक स्वच्छता न ठेवणे या बाबी टाळा; केस गळती होणाऱ्या ग्रामस्थांना प्रशासनाचे आवाहन



**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यात शेगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये मागील पंधरा दिवसांपासून अचानक नागरिकांची केस गळती होत आहे. त्यामुळे संपूर्ण आरोग्य यंत्रणा हादरली आहे तर ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान ठोस निदान होत नसल्याने आरोग्य व आयुष्य विभागाचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी देशभरातील तज्ञ शास्त्रज्ञ व डॉक्टरांना दोन दिवसांपूर्वी या गावात पाठवून येथील विविध वस्तू, खाद्यपदार्थ, पाणी, शरीरावरील केस, नखं आदींचे नमुने घेतले आहेत. त्याचा निकाल येणे अजून बाकी असून भीतीपोटी या भागातील काही नागरिकांनी आंघोळ करणे टाळले आहे. शिवाय वैयक्तिक स्वच्छता ही बंद केल्याचा प्रकार निर्दर्शनास आला आहे. हा प्रकार चुकीचा असून नागरिकांनी कुठल्याही अफवांना बळी न पडता दैनंदिन आंघोळ आणि शरीराची वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याचे आवाहन बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केले आहे.

# हरवलेल्या मतिमंद युवकांचे कुजलेले प्रेत नदीत आढळले

## ११ जानेवारी रोजी वाशीम जिल्हातील पिंप्री सरहद्द येथील त्याच्या राहत्या घरून गेला होता निघून

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव येथील कांचन नदी मधील बंधाऱ्यात १७ जानेवारीच्या सकाळी १० वाजता दरम्यान २० वर्षीय युवकाचे कुजलेल्या अवस्थेत प्रेत मिळून आल्याने एकच खळबळ माजली मात्र ते प्रेत वाशीम जिल्हातील पिंप्री सरहद्द येथील २० वर्षीय युवकाचे असल्यामुळे गावात पसरलेल्या अफवाना पूर्णविराम मिळाला.

डोणगाव येथील कांचन नदी मधल्या बंधाऱ्यात १७ जानेवारीच्या सकाळी १० वाजता दरम्यान शेतात जाणाऱ्यांना पाण्यावर तरंगत असलेला एक प्रेत दिसून आला त्याला पाहता बघ्याची गर्दी जमली व पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आली पोलीस त्या ठिकाणी पोचले असता पो का हर्ष सहगल यांनी ओळखले की वाशीम जिल्हातील ग्राम पिंप्री सरहद्द येथील तणवीर शाह युनूस शाह वय २० वर्षे हा मतिमंद युवक ११ जानेवारी रोजी शौचास जावून येतो असे सांगून घरून गेला तर परत आलाच नाही तेव्हा त्याचे सर्वीकडे शोधाशोध घेतला मात्र तो मिळून आला नाही तेव्हा त्याचे वडील युनूस शाह यांनी शिरपूर पोलीस स्टेशन जिल्हा वाशीम येथे हरवल्याची तक्रार दाखल केली ज्यात हरवलेल्या वर्णन असलेला त्याच युवकाचे ते प्रेत असल्यामुळे हर्ष सहगल यांनी शिरपूर पोलीस स्टेशन आणि पिंप्री येथील मोबाईल नंबर वरती संपर्क साधून माहिती दिली असता त्याच्या घरच्यांनी घटना स्थळी येऊन ओळख पटवली



व तोच युवक असल्याचे सांगितले त्या वरून डोणगाव पोलिसांनी पंचनामा केला व मार्ग दाखल करत ते कुजलेले प्रेत मेहकर येथे पोस्ट मार्टाम साठी पाठवले पुढील तपास डोणगाव पोलीस करीत आहेत.

## राज्य लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी – आयुक्त डॉ. किरण जाधव

**जालना/प्रतिनिधी :** नागरिकांना पारदर्शकपणे व दिलेल्या विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी तसेच त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने हा राज्य लोकसेवा हक्क कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्याच्या माध्यमातून प्रशासनाने नागरिकांच्या दारात पोहोचून विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्यासोबतच, शासनाची प्रतिमा उंचाविण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्य लोकसेवा हक्क कायदा अंमलबजावणीबाबतच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना डॉ. किरण जाधव बोलत होते.

# राष्ट्रीय आयसीटी आणि कचरा व्यवस्थापनावरील राष्ट्रीय परिषद: भारतातील घनकचरा व्यवस्थापनात क्रांती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** भारताला स्वच्छ आणि सुरक्षित बनवण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनात माहिती आणि संवाद तंत्रज्ञानाच्या (ICT) भूमिकेवर चर्चा करण्यासाठी एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (NIT) आणि राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI) यांच्या सहकार्याने आयोजित या परिषदेचे उद्दिष्ट घनकचरा व्यवस्थापन अधिक कुशल, पारदर्शक आणि पर्यावरणपूरक बनवणे होते.



परिषदेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग (ML) आणि जिओ-इन्फॉर्मेटिक्स सिस्टम (GIS) यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरावर चर्चा करण्यात आली. या तंत्रज्ञानाद्वारे कचऱ्याच्या संकलन, विल्हेवाट आणि पुनर्चक्रण प्रक्रियांना सुलभ आणि कार्यक्षम बनवण्यावर भर देण्यात आला.

महाराष्ट्रातील यशस्वी मॉडेलवर चर्चा करताना असे सांगण्यात आले की खउढ आधारित रिअल-टाइम डेटा संकलन आणि निगराणी प्रणालीने राज्यात घनकचरा व्यवस्थापनाला अधिक प्रभावी बनवले आहे. या प्रणालीचा देशभर प्रसार करून भारताला स्वच्छ आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेण्याची मोठी क्षमता आहे.

परिषदेत तज्ज्ञांनी घनकचरा व्यवस्थापनात तंत्रज्ञान, नागरी सहभाग, तसेच शासकीय धोरणांमध्ये सुधारणा करण्याची गरज मांडली. रिअल-टाइम निगराणी प्रणाली आणि डिजिटल डॅशबोर्डच्या साहाय्याने घनकचरा व्यवस्थापन अधिक जबाबदार आणि पारदर्शक बनवण्यावर भर देण्यात आला.

ही परिषद भारताच्या कचरा व्यवस्थापन क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. तांत्रिक नवकल्पना, नागरिकांची जागरूकता आणि धोरणात्मक सुधारणा यांच्या साहाय्याने भारताला स्वच्छ, शाश्वत आणि पर्यावरणपूरक भविष्याच्या दिशेने नेण्याचा या परिषदेचा उद्देश होता.

## विविध वृत्त...

### सोमवारी महिला लोकशाही दिन



**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. जानेवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार , दि. २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्याअनुषंगाने महिला लोकशाही दिन घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

### अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी दोघाविरोधात गुन्हा दाखल; मेहकर येथील घटना



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** अल्पवयीन शाळकरी मुलीस बळजबरीने मोटर सायकलवर बसवून गावाबाहेरील एका लॉज वर नेत शारीरिक संबंध करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी मेहकर पोलिसांनी दोघाविरोधात पोक्सो सह अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे ही घटना दि १६ च्या सकाळी साडे अकरा ते दुपारी चारच्या दरम्यान घडली. फिर्यादी ही शाळेत जात असताना आरोपी तिचा पाठलाग व बोलण्याचा प्रयत्न करीत होता. तर दि १६ ला तिला मित्राच्या मदतीने बळजबरीने मोटरसायकल वर बसवून गावाबाहेर बायपास वरील निवांत लॉज वर नेत एका खोलीत नेऊन तिच्या ईच्छेविरोधात शारीरिक संबंध केले व कोणाला सांगितले तर जीवे मारण्याची धमकी दिली. पिडितेच्या तोंडी तक्रारी वरून मेहकर पोलिसांनी आरोपी मोहन उर्फ राज चव्हाण, वय २० राहणार खंडाळा तसेच ओम प-हाड वय २० राहणार बाभुळखेड या दोघाविरोधात पोक्सो, अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदानुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर तपास उपविभागीय अधिकारी प्रदीप पाटील करीत आहेत.

### शेगाव तालुक्यातील केस गळतीचे कारण शोधण्यासाठी डब्ल्यूएचओची मदत घ्यावी; शिवसेना ठाकरे गटाची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :-** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात गेल्या वीस दिवसांपासून केस गळतीमुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे. स्थानिक आरोग्य यंत्रणेपासून राष्ट्रीय पातळीवरील आरोग्य संस्था केस गळतीचे कारण शोधण्यासाठी बाधित गावात भेट देऊन तपासणी करत आहेत. मात्र अजूनही केस गळतीचे नेमके कारण शोधण्यात या आरोग्य संस्थांना यश आलेले नाही. राष्ट्रीय पातळीवरच्या संस्थांना देखील केस गळतीचे नेमके कारण सापडत नसेल तर आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्था डब्ल्यूएचओला या प्रकरणात पाचारण करण्याची मागणी यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर यांनी केली आहे.

### सैफ अली खान हल्ला प्रकरणात गुन्हेगारी टोळीचा हात नाही – गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची माहिती

**पुणे/प्रतिनिधी :** चित्रपट अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या हल्ल्यात गुन्हेगारी टोळीचा हात नसल्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. हल्ला प्रकरणात एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून, चोरीच्या उद्देशाने हल्ला झाल्याचे त्यांनी सांगितले. योगेश कदम यांनी शुक्रवारी पुणे पोलीस आयुक्तालयास भेट दिली. कदम यांच्या उपस्थितीत पोलीस आयुक्तालयात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. बैठकीनंतर कदम यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुंबईतील वांद्रे भागात सैफ अली खान याच्या निवासस्थानात शिरुन हल्ला करण्यात आल्याची घटना गुरुवारी घडली. यापूर्वी वांद्रे भागात अभिनेता सलमान खान याच्या निवासस्थानावर गोळीबार करण्यात आला. माजी आमदार बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळ्या झाडून खून करण्यात आला.